असा. क्र. ५१ रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५




# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**गुरुवार, ऑगस्ट २५, २००५/भाद्र ३, शके १९२७**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**


## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

### अनुक्रमणिका


पृष्ठे

**सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३.**—महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम. . . . . ४८०-४८१


दिनांक २४ ऑगस्ट २००५ रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**अ. मा. शिंदेकर,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

### सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३.

(माननीय राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक २५ ऑगस्ट २००५ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

### महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.

१९६६ चा महा. ४१.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या छप्पन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) अधिनियम, २००५ असे म्हणावे. संक्षिप्त नाव.





[**किंमत** : रुपये ९.००]

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम २ ची सुधारणा.

२. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त संहिता " असा करण्यात आला आहे) याच्या कलम २ मध्ये, खंड (३३) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :— १९६६ चा महा. ४१.

" (३३क) ' साठवणुकीचे यंत्र (Storage Device) ' याचा अर्थ, संगणकामध्ये माहिती साठवून ठेवण्यासाठी वापरण्यात येणारे इलेक्ट्रॉनिक/विद्युत यंत्र, असा आहे आणि यात, यंत्रसामग्री व आज्ञावली (हार्डवेअर व सॉफ्टवेअर) या दोन्हींचा समावेश होतो ; ".

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ यामध्ये नवीन कलम १४८क समाविष्ट करणे.

३. उक्त संहितेच्या कलम १४८ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

योग्य ते साठवणुकीचे यंत्र वापरून अधिकार अभिलेख ठेवणे.

" **१४८क.** कलम १४८ अन्वये ठेवण्यात आलेले अधिकार अभिलेख आणि या प्रकरणाच्या अन्य तरतुदींन्वये ठेवण्यात आलेले भूमि अभिलेख हे योग्य ते साठवणुकीचे यंत्र वापरून देखील ठेवता येतील. ".

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम १५० ची सुधारणा.

४. उक्त संहितेच्या कलम १५० मधील, पोट-कलम (७) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल :—

" (८) आयुक्तास, कलम १४८क अन्वये ठेवावयाच्या सर्व नोंदवह्या आणि दस्तऐवज तयार करण्यासाठी आणि त्यांचे परिरक्षण व अद्ययावतीकरण करण्यासाठी, वेळोवेळी साठवणुकीचे यंत्र, विनिर्दिष्ट करता येईल. ".

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई